## निशाणी ६६ वरील पुढील आदेश

प्रस्तुत अर्ज हा विनोद गवाजी कुलकर्णी (भुसंपादन अर्ज क्र.२४२/२०१३ मधील जाबदार क्र.४) यांनी त्यांचे भारतीय स्टेट बँक, दशमेश नगर शाखा, छत्रपती संभाजीनगर मधील खाते क्र.२०१२८१९५६५४ अनफ्रिज करण्यासाठी केला आहे.

२. प्रस्तुत अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

३. अभिलेखानुसार या प्रकरणी ०३.०८.२०२४ रोजी जाबदार क्र.४ यांच्या याच अर्जावर (नि.६६) वर सविस्तर आदेश पारित करुन याबाबत संबंधीत बँक कडुन आदेश अभिलेख प्रत मागविणेचा आदेश केला होता.

४. तद्नंतर आजरोजी जाबदार क्र.४ व त्यांचे वि. वकिल समक्ष हजर असुन त्यांनी नमुद केले की, नि.६६ वरील ०३.०८.२०२४ चे आदेशानुसार बँकेने तत्कालीन वि. ३रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, औरंगाबाद (के. व्ही. मोरे) यांचे २५.११.२०१५ रोजीचे पत्राची प्रत (नि.७३) तसेच बँक मॅनेजरचे पत्र (नि.७४) ऑनलाईन दाखल केली आहे आणि या अर्जाबाबत जाबदार क्र.४ चे सविस्तर शपथपत्र (नि.७०), खाते उतारा व त्यावर बँक मॅनेजरचा हस्तलिखीत अहवाल (नि.६९) सुध्दा पुर्वीच ऑनलाईन दाखल केलेला आहे. त्यायोगे सदर अर्ज (नि.६६) मंजुर करुन खाते अनफ्रिज करावे.

५. उपरोक्त सर्व बाबींचे एकत्रीत अवलोकन केले असता असे दिसते की, जाबदार क्र.४ यांचे प्रस्तुत अर्जकथन हे शपथपत्र (नि.७०) सोबत अभिलेखावर असुन त्याबाबत त्यांनी प्रस्तुत खाते उतारा व त्यावर बँक मॅनेजरचा हस्तलिखीत अहवाल (नि.६९) वर सुध्दा भिस्त ठेवली आहे. तसेच सदर बँक

खाते हे तत्कालीन वि. ३रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, औरंगाबाद (के. व्ही. मोरे) यांचे २५.११.२०१५ रोजीचे पत्र (नि.७३) नुसार फ्रिज केल्याचे दिसुन येते. तद्नंतर सदर प्रकरण हे मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे मध्यस्थी प्रक्रियेमध्ये तडजोडीने निकाली झाल्याचे अभिलेखावर आहे. त्या अनुषंगाने सदर खात्यात पुर्वी जमा झालेली रक्कम परत न्यायालयात जमा करुन तिचे यापुर्वीच वाटप झाल्याचे आणि त्यातील जाबदार क्र.४ चा हिस्सा म्हणुन सदर प्रकरणातील तडजोडीमध्ये त्यांना रु.७,६२,००५/- एवढीच रक्कम मिळालेली असल्याचे नमुद केले आहे. सदर तपशिल नि.६६ वरील ०३.०८.२०२४ चे आदेशामध्ये आलेला आहे. माझ्या मते, या सर्व बाबी एकत्रीत विचारात घेता प्रस्तुत प्रकरणाशी संबंधीत बाबीपुरते विनोद गवाजी कुलकर्णी यांचे भारतीय स्टेट बँक, दशमेश नगर शाखा, छत्रपती संभाजीनगर मधील खाते क्र.२०१२८१९५६५४ अनफ्रिज करण्याचे निर्देशित करणे योग्य होईल.

६. यास्तव मी खालीलप्रमाणे आदेश करतो.

## <u>आदेश</u>

प्रस्तुत प्रकरणाशी संबंधीत बाबीपुरते विनोद गवाजी कुलकर्णी यांचे भारतीय स्टेट बँक, दशमेश नगर शाखा, छत्रपती संभाजीनगर मधील खाते क्र.२०१२८१९५६५४ अनफ्रिज करण्याचे निर्देशित करणेत येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JADHAV KIRAN SAHEBRAO
Date: 2024.08.07 17:45:11 +0400

(के. एस. जाधव)

दि.०७/०८/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, औरंगाबाद

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.M. Shaikh |
| Name of the Court | : | Jt. CJSD Court, Aurangabad. |
| Order date | : | 07.08.2024 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 07.08.2024 |
| Order uploaded on | : | 07.08.2024 |